# प्रकरणे २ रे

## आत्मचरित्रत्मक कादंब-याचे स्वरूप व त्यांची चर्चा

चरित्र वाङ:मयाचे मूळ सातशे वर्षापूर्वीच्या महानुभावीच वाङ:मयात सापडते. त्यानंतर १८७४ पासून अनेक चरित्रे उदयास आली. यातूनच आत्मचरित्रांच्या उदय झाला. आपल्या वेदना, दु:ख मांडण्यासाठी , त्यातून समाजाने केलेल्या समाजकार्याचे गुण घ्यावे यासाठी आत्मचरित्रांचा उदय झाला. दुस-यांची चरित्रे लिहित असतानाच यातूनच चरित्रात्मक कादंबरीचा जन्म झाला. तसाच आत्मचरित्रातूनच आत्मचरित्रात्मक कादंबरीचा उदय झाला. भालचंद्र नेमाडे, शरच्चंद्र मुक्तीबोध सारख्या लेखकांच्याबरोबरच डॉ. आनंद यादव यांनीही अशा प्रकारच्या कादंब-या लिहिल्या. या आत्मचरित्रात्मक कादंब-याचा उदय कसा झाला. याची सविस्तर चर्चा खाली केली आहे.

## चरित्रे

चरित्र हा वाङ:मयाचा एक प्रकार आहे. चरित्र अथवा चरित्र हे शब्द संस्कृतमधील चर या धातूपासून सिध्द झालेले आहेत. व्यक्तिच्या गतकाळातील, वैयक्तिक जीवनातील घटना, वास्तवाचे चित्रण चरित्रात येते. चरित्र हा वस्तुनिष्ठ प्रकार आहे. चरित्रात चरित्र नायकाच्या गुणांचीच मांडणी केल्यामूळे त्या चरित्राबद्दल समाजात आस्था, सहानुभूती निर्माण होते. चरित्र हा इतिहास असला तरी तया व्यक्तिविशिष्टतेला प्राधान्य असते. चरित्रात जीवनाची व्यक्तिनिष्ठ पातळीपेक्षा वैयक्तिक जीवन महत्वाचे असते. चरित्र म्हणजे निव्वळ इतिहास नव्हे तर चरित्रात इतिहास असतो.

चरित्र नायक जितका थोर तितके त्याचे चरित्र विस्तृत असते. अशी एक कल्पना आहे. चरित्रनायकाचा ज्या ज्या गोष्टीशी किंवा व्यक्तिशी संबंध आला असेल त्याचे तपशिलवार वर्णन आलेच पाहिजे असे नाही. त्यात योग्य ती निवड आवश्यक आहे. प्रामुख्याने चरित्रनायकाचे कुल, घराणे यांची माहिती चरित्रात येणे आवश्यक आहे. कारण यावरूनच तयाच्या घराण्याचा दर्जा, प्रतिष्ठा याचे स्वरूप समजते. तत्कालीन समाजा समाजातील श्रध्दा-अंधश्रध्दा, रूढी-परंपरा यांचे स्वरूप समजते. तसेच चरित्रनायकाच्या बालपणीचे मित्र, शिक्षक, घरातील नोकर-चाकर यांच्या माहिती बरोबरच त्याच्या व्यक्तिमत्त्वाची घडण कशी झाली ते कळते. तसेच चरित्रनायकाच्या मृत्यूसमयी त्याच्या अवस्थेचे वर्णन करणे, कारण त्यावेळी त्याची असणारी समाधानी-असमाधानी वृत्ती इतरांविषयी त्याच्या भावना प्रकट होतो. यावेळी मात्र औचित्याचे भाव राखले पाहिजे.

चरित्राचा मूलतः हेतू व्यक्तीच्या जीवनातील विविध घटना सादर करणे असतो. चरित्र हे एका अंगाने कादंबरीसारखे आहे. कारण त्यात चरित्रनायकाची जीवनकथा असते.

कमालीच्या दारिद्रयात रस्त्यावरच्या दिव्याखाली अभ्यास करणारा नगण्य पोरगा जेव्हा परिस्थितीशी झुंज देत समाजाचे वैचारिक नेवृत्व करणारा थोर पुरूष बनलेला जेव्हा आपण पाहतो तेव्हा थक्क होऊन जातो. मानवी जीवनात जर नाटय नसते तर अशा अनपेक्षित, अकल्पित, आकस्मिक, आश्चर्यकारक घटना घडल्याच नसत्या, पण त्या घडतात म्हणूनच मानवी जीवनाच्या अस्तित्वाला काही अर्थ प्राप्त होतो. चरित्र म्हणजे ऐतिहासिक सत्याच्या आधारे घडविलेले एखादया व्यक्तीचे विश्वसनीय, अस्सल, निःशंक आणि एकसंघ असे व्यक्तिदर्शन होय.

चरित्रकार हा कलावंत असतो. तो आपल्या चरित्राात सत्यवृत्त कथन करीत असतो. चरित्रात माणसाच्या संपूर्ण आयुष्यक्रमाचा किंवा निदान काही महत्वाच्या भागाचा समावेश त्यात असावा. कारण याच गोष्टी सोयीस्करित्या चरित्राचे साहित्यरूप निश्चित करतात. चरित्र म्हणजे नुसता इतिहास नसतो. तर त्यात व्यक्तीचे गुणवर्णनही येते. उदा. 'लीळाचरित्र' .

कोणत्याही थोर पुरूषाचे, स्त्रीचे स्मरण करताना स्मरणकार केवळ तया व्यक्तीच्या चांगुलपणावर अथवा गुणगौरवावर भर देतो. परंतू हे चुकीचे आहे. तर व्यक्तित्वाच्या यथातथ्य वर्णन चरित्रात अपेक्षित असते. चरित्रकाराने व्यक्ती चांगली की वाईट हे न सांगता त्या व्यक्तीच्या गुणदोषाची कृतिउक्तीद्वारे अप्रत्यक्ष चिकित्सा करायची असते.

इतर वाङःमयप्रकारापेक्षा चरित्र हा प्रकार कर्तव्याकर्तव्य विचारावर, नितिमत्तेवर अधिक भर देणारा आहे. या प्रकारात विश्वसनीयता आहे. यामुळे माणसाच्या अस्तित्वाविषयी खात्री पटते व त्याचा वाचकावर प्रभाव पडतो.

इतरेजनांपासून चरित्रनायकाचे वेगळेपण सिध्द होईल अशाच कृतिउक्तीना प्रामुख्याने चरित्र्यात जतन केले जाते. आणि स्वाभाविक चारित्रनायक सर्वसामान्य माणसापेक्षा काही उंचीवर असतो. ज्या गुणामुळे त्याला ही उंची लाभलेली असते. ते गुण सर्वसामान्यात नसतात. इतकेच काय पण समकालीनांच्याही दृषेत्पत्तीस ते कित्येकदा आलेले नसतात. अशा गुणांचा प्रत्यत जेव्हा वाचकांना येतो तेव्हा स्वाभविकच त्यांना आनंद होतो आणि याच अर्थाने इतर ललित वाङःमयप्रमाणेच आनंद निर्मिती हेही प्रयोजन अपेक्षिता येईल.

चरित्रलेखकाला निःपक्षपाती भूमिका घ्यावी लागते. चरित्रनाकाविषयी आदर आणि सहानुभूती असली तरीही केवळ गुणसंकीर्तन करणे हा चरित्रलेखनाचा हेतू नसावा. आणि केवळ पूर्वग्रहदूषितवृत्तीने दोष दिग्दर्शनाचाही हेतू नसावा. चरित्रनायक असामान्य असला तरीही त्याचे मनुष्यत्व पटवून देणे हे चरित्रातील व्यक्तिदर्शनाचे उद्दिष्ट असावे.

चरित्रलेखनाच्या मुळाशी विविध हेतू दिसत असले तरीही 'सत्यपूर्ण व्यक्तिदर्शन' हाच चरित्राचा वाड:मयीन हेतू मानता येईल. चरित्रग्रंथामध्ये संपूर्ण जीवनकथेला आकार दयावयाचा असतो. त्यामुळे चरित्रकार प्रामुख्याने घटनाप्रसंगाची निवड करतो. स्वाभविकच बारीकसारीक प्रसंग महत्वाच्या घटनांच्या तुलनेने चरित्रकाराला क्षुद्र वाटतात आणि चरित्रग्रंथातून त्या वगळल्या जातात.

चरित्र हे व्यक्तीचे जीवनचरित्र अथवा व्यक्ती चरित्र असते म्हणजे त्यात व्यक्तीच्या जीवनाचा अथपासून इतिपर्यंत वृत्तांत सांगितलेला असतो. तर व्यक्तीचरित्रात जीवनातील निवडक घटना प्रसंगाच्या आधारे यथार्थ व्यक्तीदर्शन घडविलेले असते. चरित्रकार हा सत्यकथन करीत असतो. चरित्रविषयातील लहान मोठया घटनांनी तो छाननी करतो आणि चरित्रविषयाला संपूर्ण आकार देतो. त्यातूनच आपल्याला व्यक्तीदर्शन घडते.

जसा चरित्रात सत्याला चिकटून चरित्र लिहिण्याचा प्रयत्न केला जातो तसा प्रयत्न कादंबरीतून केला जात नाही. कादंबरीकार अज्ञात घटना प्रसंग व व्यक्ती यांना बोलके करू शकतो. हे स्वातंत्र्य कादंबरीकाराला आहे. चरित्रकाराला नाही. पुष्कळदा कादंबरीकार 'प्रस्तुत कादंबरी ही वास्तवावर आधारलेली आहे' असे म्हणतो तसे स्वत:च्या सोयीनुसार मानण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य कादंबरीकाराला आहे. चरित्रकार मात्र वास्तवाला कल्पित असे रूप देऊ शकत नाही.

चरित्र हे वाचनीय व्हावे, परिणामकारक व्हावे यासाठी चरित्रकार कादंबरीतील लेखनप्रवृत्तीचे अवलंबन करतो. पण त्यात समतोल जर राखला गेला नाही तर 'चरित्र' कादंबरी होण्याचा धोका असतो. ही जाणीव चरित्रकाराला असते आणि त्यातूनच एक संकरित असा वाड:मय प्रकार जन्माला येतो. ज्याला आपण सामान्यत: 'चरित्रात्मक कादंबरी असे म्हणतो. यात 'चरित्र' आणि 'कादंबरी' या दोन्ही वाड:मयप्रकाराचा समन्वय साधलेला असतो. चरित्राला कादंबरीचे तर कादंबरीला चरित्राचे रूप देता येते.

'चरित्रात्मक कादंबरी' तील चरित्रविषय हा 'वास्तव' असेल अथवा 'कल्पित' असेल अथवा 'कल्पिता' त वास्तवाचा आभासही निर्माण केलेला असेल. उदा. 'आनंदी गोपाळ' ही श्री. ज. जोशी यांची कादंबरी. उध्दव शेळके यांची 'साहेब' नावाची कादंबरी म्हणजे अत्र्यांच्या अष्टपैलू जीवनाचे धावते चरित्र चित्रण आहे. परंतु अत्र्यांच्या भाव जीवनांचे प्रत्ययकारी दर्शन तयात घडत नाही. भावानुभव, भावजीवन यापेक्षा कर्तृत्वविषयक तपशिल त्यात जास्त आहे. यावरून चरित्र व कादंबरी यातील भेद लक्षात घेतला पाहिजे.

चरित्रात्मक कादंबरीमध्ये भावजीवनाचे दर्शन नसेल तर ती कादंबरी म्हणजे व्यक्तीचा चरित्रात्मक इतिहास बनते. परंतु कलेच्या पातळीवर जेव्हा इतिहास, चरित्र आणि कल्पित यांचा लक्षणीय समन्वय साधतो. तेव्हा ती चरित्रात्मक कादंबरी वाड.मयीन

दृष्टया परिपूर्ण होऊ शकते. अन्यथा ती धड कादंबरी होत नाही आणि चरित्रही होत नाही. उदा. 'आनंदी गोपाळ'.

चरित्राचा आधार होऊनही जेव्हा कादंबरीकार कल्पितावरच भर देतो तेव्हा चरित्रातील सत्य हे कल्पितातच मिसळून जाते आणि कल्पितालाच प्राधान्य मिळते. उदा. ना. सं. इनामदार यांची बाजीरावच्या जीवनावरील 'राऊ' ही कादंबरी ही चरित्रात्मक कादंबरी होत नाही. याउलट लो. टिळक यांच्या जीवनचरित्रातील भरपूर तपशिल देऊनही गंगाधर गाडगीळ यांच्या 'दुर्दम्य' या कादंबरीला कलात्मक कादंबरीचे रूप घेऊ शकले नाही.

'चरित्र' ला कलत्मकतेचे रूप देण्याच्या प्रवृत्तीतूनच 'चरित्रात्मक कादंबरी' चा जन्म झाला असावा असे वाटते. अलिकडे मराठीत थोर पुरूषांची चरित्रे लिहिण्याऐवजी थोरपुरूषांच्या जीवनावर चरित्रात्मक कादंबरी लिहिण्याची प्रवृत्ती बळावत चाललेली आहे. टिळक, नेहरू, शास्त्री, सावरकर, बोस इत्यांदीचे जीवनचरित्र हा चरित्रात्मक कादंबरीचा विषय झालेला आहे. कादंबरीच्या माध्यमातून चरित्र सांगण्याचा हा प्रकार आहे. अलिकडे नोव्हेंबर ९८ मध्ये विश्वास पाटील यांची सुभाषचंद्र बोस यांच्या चरित्रावर 'महानायक' ही कादंबरी प्रसिध्द झालेली आहे.

कादंबरीत बरेचसे 'अज्ञात' असते आणि चरित्रांतर्गत 'ज्ञाता' तसे काही वगळून त्यात 'अज्ञाता'ची भर घालणे अपरिहार्य असते आणि म्हणूनच 'सत्यपूर्ण व्यक्तिदर्शन' हा जो चरित्र लेखनाचा हेतू असतो. तो चरित्रात्मक कादंबरीत सफल होत नाही. किंबहूना चरित्र लेखनाचे जे अन्य हेतू आहेत त्यांचाही संक्षेप किंवा लोप चरित्रात्मक कादंबरीत होतो आणि चरित्रात्मक कादंबरीलाही प्राधान्येकरून कादंबरीचे हेतू स्विकारावे लागतात.

चरित्र लेखन ही जरी चरित्रात्मक कादंबरीची प्रेरणा असली तरीही चरित्र लेखनातील कलात्मकतेसाठी 'चरित्रात्मक कादंबरी' हा पर्याय होऊ शकत नाही. आत्मचरित्र हा चरित्राचाच एक प्रकार पुढे उदयाला आला.

## आत्मचरित्र

'आत्मचरित्र' हा साहित्यप्रकार मराठीत आधुनिक समाज-व्यवस्थेत रूढ झाला. 'आत्मचरित्र' या आधुनिक साहित्य प्रकारात 'आत्मशोधा' ची जी संकल्पना आहे ती भौतीक पातळीवरची आहे. ती 'आधुनिक' मानवाची भौतिक पातळी आहे, हेही इथे नीटपणे लक्षात ठेवण्याची गरज आहे. मराठी भारतीय आत्मचरित्रांत व्यक्तिमत्वाच्या किंवा व्यक्तिवैशिष्ट्यांच्या गुणदोषांपेक्षा, प्रमादापेक्षा तिच्या कार्यावर वाचकाची नजर विशेष खिळते. घर, कुटुंब, समाज, संस्कुती, ध्येय, देश यांच्यासाठी व्यक्तिने केलेल्या कार्यावर

व वर्तनावर मराठी वाचक आत्मचरित्राचे व तिच्यातील व्यक्तिचे मोल ठरवितो. आत्मचरित्राचे लेखन करणा-या मराठी मनालाही हीच प्रेरणा विशेष भावते.

आत्मचरित्रकाराने आपल्या समाजसेवक जीवनाचा आदर्श, आत्मचरित्र लेखनाच्या रूपाने समाजासमोर ठेवलेला असतो. तरूण पिढीकडून, कर्त्या समाजपिढीकडून त्याचे अनुकरण व्हावे, अशी अपेक्षा ध्वनित केलेली असते. आत्मचरित्र हा एका जिवंत हाडामासाच्या व्यक्तिने स्वतःचाच दिलेला अंतर्बाह्य स्वरूपाचा वृत्तांत असतो. तो समग्र, सर्वांगानी अभ्यासून, पारखून दिलेला असतो म्हणून वाचकाच्या दृष्टीने तो महत्वाचा असतो. समाजात जगणारी एखादी व्यक्ति कशी जगू शकते, कोणत्या गोष्टींना तिला तोंड द्यावे लागते, ती वाटचाल कशी करू शकते, तिच्या जगण्याला इतर शेकडो कोणकोणते घटक कशी मदत वा सहकार्य करतात किंवा अडथळे, विरोध, विक्षेप आणतात याचा ते लेखन दस्तऐवज असते. त्याच्या या स्वरूपामुळे वाचणा-या व्यक्तिला 'आत्मचरित्र' हा आत्मविश्वासपूर्वक प्रकाश देणारा जीवन प्रवासातील मार्गदर्शक दीप वाटत असतो. वाचकाच्या मनात हा आत्मविश्वास निर्माण करण्याची फार मोठी जबाबदारी आत्मचरित्रकावर असते. त्याच्या आत्मचरित्राचे लेखन ज्या स्वरूपाचे ज्या दर्जाचे आणि योग्यतेचे होईल त्यावरच या आत्मविश्वाचाही दर्जा, स्वरूप आणि योग्यता अवलंबून असते. जर वडिलार्जित इस्टेट, संपत्ती किंवा धन असेल, ते असल्यामुळे काही मिळविण्यासाठी संघर्षच करावा लागत नसेल, इच्छेप्रमाणे सर्वकाही संघर्षाशिवाय आपसुक मिळत गेलेले असेल. सगळ जीवनच सुरळीत, सुदैवी, स्वास्थप्रिय असेल तर स्वतःच्या जीवनात अर्थपूर्ण अनुभव येणार कसे, असा एक प्रश्न उपस्थित करता येतो. अशा प्रकारचे जीवन जगलेला माणूस जेव्हा आत्मचरित्र लेखन करू शकेल तेव्हा त्याच्याजवळ भूतकालीन अनुभवात पुन्हा रमण्याशिवाय गतगोष्टीत अवाहन करीत राहण्याशिवाय दुसरा कोणता पर्याय असणार? अर्थात, अशी सुदैवी माणसे दुर्मिळ असली तरी भूतकाळात केवळ रमणारी उतार वयातील वृध्द माणसे खुप असतात. हे तिकेच खरे आहे.

आत्मचरित्रात व्यक्तिच्या वाटण्याचा मुक्त अविष्कार करता येतो तो समाज कौतुकाने वाचतो. त्या व्यक्तिच्या त्या विशिष्ट प्रतिमेला, तिच्या विशिष्ट कर्तृत्वाला चरित्र लेखनाच्या मुळाशी विविध हेतू दिसत असले तरीही 'सत्यपूर्ण व्यक्तिदर्शन' हाच चरित्राचा वाङ:मयीन हेतू मानता येईल. चरित्रग्रंथामध्ये संपूर्ण जीवनकथेला आकार द्यावयाचा असतो. त्यामुळे चरित्रकार प्रामुख्याने घटनाप्रसंगाची निवड करतो. स्वाभाविकच बारीकसारीक प्रसंग महत्वाच्या घटनांच्या तुलनेने चरित्रकाराला क्षुद्र वाटतात आणि चरित्रग्रंथातून त्या वगळल्या जातात.

चरित्र हे व्यक्तिचे जीवन चरित्र अथवा व्यक्तिचरित्र असते. म्हणजे त्यात व्यक्तिच्या जीवनाचा अथपासून इतिपर्यंत वृत्तांत सांगितलेला असतो. तर व्यक्तिचरित्रात

जीवनातील निवडक घटना प्रसंगांच्या आधारे यथार्थ व्यक्तिदर्शन घडविलेले असते. चरित्रकार हा सत्यकथन करीत असतो. चरित्रविषयातील लहान मोठया घटनांनी तो छाननी करतो आणि चरित्रविषयाला संपूर्ण आकार देतो. त्यातूनच आपल्याला व्यक्तिदर्शन घडते.

जशी चरित्रात सत्याला चिकटून चरित्र लिहिण्याचा प्रयत्न केला जातो. तसा प्रयत्न कादंबरीतून केला जात नाही. कादंबरीकार अज्ञात घटना प्रसंग व व्यक्ति यांना बोलके करू शकतो. हे स्वातंत्र्य कादंबरीकाराला आहे. चरित्रकाराला नाही. पुष्कळदा कादंबरीकार 'प्रस्तुत कादंबरी' ही वास्तवावर आधारलेली आहे. असे म्हणतो तसे स्वतःच्या सोयीनुसार मानण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य कादंबरीकाराला आहे. चरित्रकार मात्र वास्तवाला कल्पित असे रूप देऊ शकत नाही.

चरित्र हे वाचनीय व्हावे, परिणामकारक व्हावे यासाठी चरित्रकार कादंबरीतील लेखन प्रवृत्तीचे अवलंबन करतो. पण त्यात समतोल जर राखला गेला नाही तर 'चरित्र' कादंबरी होण्याचा धोका असतो. ही जाणीव चरित्रकाराला असते आणि त्यातूनच एक संकरित असा वाङ:मयप्रकार जन्माला येतो. ज्याला आपण सामान्यतः 'चरित्रात्मक कादंबरी असे म्हणतो यात 'चरित्र' आणि 'कादंबरी' या दोन्ही वाङ:यप्रकारांचा समन्वय साधलेला असतो. चरित्राला कादंबरीचे तर कादंबरीला चरित्राचे रूप देता येते.

चरित्रात्मक कादंबरीतील चरित्रविषय हा 'वास्तव' असेल अथवा 'कल्पित' असेल अथवा 'कल्पिता'त वास्तवाचा आभासही निर्माण केलेला असेल उदा. 'आनंदी गोपाळ' ही श्री. ज. जोशी यांची कादंबरी उध्दव शेळके यांची 'साहेब' नावाची कादंबरी म्हणजे अत्र्यांच्या अष्टपैलू जीवनाचे धावते चरित्रचित्रण आहे. परंतु अत्र्यांचया भावजीवनाचे प्रत्ययकारी दर्शन त्यात घडत नाही. भावानुभव, भावजीवन यापेक्षा कर्तृत्वविषयक तपशिल त्यात जास्त आहे. यावरून चरित्र व कादंबरी यातील भेद लक्षात घेतला पाहिजे.

चरित्रात्मक कादंबरीमध्ये भावजीवनाचे दर्शन नसेल तर ती कादंबरी म्हणजे व्यक्तिचा चरित्रात्मक इतिहास बनते. परंतु कलेच्या पातळीवर जेव्हा इतिहास, चरित्र आणि कल्पित यांचा लक्षणीय समन्वय साधतो. तेव्हा ती चरित्रात्मक कादंबरी वाङ:मयीन दृष्टया परिपूर्ण होऊ शकते अन्यथा ती धड कादंबरी होत नाही आणि चरित्रही होत नाही. उदा. 'आनंदी गोपाळ'

चरित्राचा आधार घेऊनही जेव्हा कादंबरीकार कल्पितावरच भर देतो तेव्हा चरित्रातील सत्य हे कल्पितातच मिसळून जाते आणि कल्पितालाच प्राधान्य मिळते. उदा. ना. स. इनामदार यांची बाजीरावच्या जीवनावरील 'राऊ' ही कादंबरी ही चरित्रात्मक कादंबरी होत नाही. याउलट लो. टिळक यांच्या जीवनचरित्रातील भरपूर तपशील देऊनही गंगाधर गाडगीळ यांच्या 'दुर्दम्य' या कादंबरीला कलात्मक कादंबरीचे रूप येऊ शकले नाही.

चरित्राला कलात्मकतेचे रूप देण्याच्या प्रतृत्तीतूनच 'चरित्रात्मक कादंबरी' चा जन्म झाला असावा असे वाटते. अलिकडे मराठीत थोर पुरूषांची चरित्रे लिहिण्याऐवजी थोर पुरूषांच्या जीवनावर चरित्रात्मक कादंबरी लिहिण्याची प्रवृत्ती बळावत चाललेली आहे. टिळक, नेहरू, शास्त्री, सावरकर, बोस इत्यादींचे जीवनचरित्र हा चरित्रात्मक कादंबरीचा समाज मान्यता देतो. त्यामुळे आधुनिक समाजातील कर्तृत्वान व्यक्तिला आत्मचरित्र लिहिण्याची प्रेरणा होऊ शकते. या प्रेरणेला 'आत्मप्रतिमेच्या जाणिवेची प्रेरणा' असे म्हणता येईल.

आत्मप्रेम ही माणसाच्या जगण्याची मूलभूत प्रेरणा आहे. पुष्कळ आत्मचरित्रात ही प्रेरणा प्रभावी असते. त्याला स्वत:ची चांगली बाजू मनापासून महत्वाची वाटत असते, म्हणून तो ती सांगत असतो. तो आपल्या या प्रेरणेनुसार आणि आपल्या विचारसरणीनुसार समर्थन करतो. म्हणून आत्मचरित्रात कमीअधिक प्रमाणात आत्मसमर्थन हे येणारच. त्याच्यावरच समीक्षकांनी पुनः पुन्हा बोट ठेवणे किंवा तो दोष म्हणून दाखवून स्वतः श्रेय वा समाधान मिळविणे फारसे समर्थनीय आणि स्पृहणीयही नाही.

'आत्मशोध' ही आत्मचरित्राची महत्वाची प्रेरणा आहे. व्यक्ति अनेक घटना, प्रसंग, अनुभव यातून जात असते. जीवनातील अनेक प्रकारचे अनुभव एकाच व्यक्तिला येऊ शकतात. ही व्यक्ति सर्व प्रकारचे सामाजिक व्यवहार, मूल्ये, संकेत, रूढी, कायदे, धर्म, संस्कृती, स्वभावना, वासना, विकार, विचार, ध्येये, स्वार्थ इत्यादींच्या विविध चौकटीत राहून जगत असते. या चौकटीत राहून यशस्वी होण्याचा विचारही ती करत असते. पण या सर्वांच्या पलीकडे जाऊन मानवी जीवाच्या वर्तनाचा शोध घेणारी 'आत्मशोधाची' संकल्पना आहे. अशी मिमांसा असलेली आत्मचरित्रे वाचताना वाचकाला मानवी जीवनाविषयी खूप काही कळले, असे वाटते. अशी आत्मचरित्रे उच्च कोटीतील असतात. उदा. क्षिप्रा - शरच्चंद्र मुक्ती बोध.

आत्मशोधापेक्षा, आत्मविष्काराची प्रेरणा वेगळी आहे. आत्मविष्काराची प्रेरणा भावनात्मक स्वरूपाची, भावसंवेदनाच्या अंगाने अभिव्यक्त होणारी असते. तिच्यात समातोल, विचार, चिंतन यापेक्षा मनाला अस्वस्थ करून सोडणा-या भावनांचे मुक्त विमोचन असते.

आत्मचरित्राच्या विषयाचे मूळ स्वरूप आत्मशोध घेणे, तो विशद करणे हेच असते. त्याचे मन:पूर्वक लेखन केले तर ते स्वत:च पुष्कळ काही सांगून जाते. ते स्वयंप्रकाशी असल्याने पुष्कळ वाचकांना हव्या असलेल्या अनेक वाटांवर त्याचा आपोआप प्रकाश पडतो. आत्मचरित्राच्या बाबतीत आणखी एक वस्तुस्थिती लक्षात घ्यावी लागते. आत्मचरित्रे लिहिणारे सगळेच काही साहित्यिक नसतात. साहित्यक्षेत्राच्या बाहेरच्या

व्यक्तिही आत्मचरित्रे लिहू शकतात. अशा व्यक्तिंच्या आत्मचरित्रांचे लेखन हे साधे, सरळ, कालक्रमनिष्ठ, हकीकतसदृश्य, वृत्तान्तसदृश असे असते.

एका विशिष्ट काळात, एका विशिष्ट समाज व्यवस्थेत जन्माला आल्यामुळे आणि त्या व्यवस्थेत जगल्यामुळे त्या समाजातील धर्म , संस्कृती, रूढी, रिवाज, संकेत, कायदे यांनी आपल्यावर अन्याय केला, आपल्याला उपेक्षित केले. आपले शोषण केले. या जाणिवेने मराठीत १९७० नंतर बरीच आत्मचरित्रे लिहिली गेली. विशेषत: नवजागृत समाजस्तरांतून ती निर्माण झाली. त्यांच्यामुळे तया समाजस्ताराची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थिती कळली. त्या समाजस्तराची शेकडो वर्षे झालेली उपेक्षा कळली. ती कळावी म्हणूनच ही आत्मचरित्रे लिहिली गेली त्यांचा अपेक्षित हेतू साध्य झाला.

१९६० नंतरच्या काळात आत्मचरित्राचा वेगळया दृष्टिने विचार होऊ लागला. आत्मचरित्र हे एखाद्या साहित्यिकाने लिहिलेल्या कविता, कथा, कादंबरी, नाटक यांतही असू शकते. विशेषत: कादंबरीसारख्या प्रकार हा साहित्यरूपात्मक आत्मचरित्र असू शकते. आत्मचरित्राचा तो एक वेगळा प्रकार होऊ शकतो. असे मानले जाऊ लागले. आणि यातूनच आत्मचरित्रात्मक कादंब-याचा उदय झाला. (पृष्ठ ३३)

## आत्मचरित्रात्मक कादंबरी

१९७० नंतर आत्मचरित्रांचा आणि आत्मकथांचा 'कादंबरी' म्हणून जाहिरातीत उल्लेख केला जातो. आत्मचरित्र आणि कादंबरी या दोन्ही प्रकारात काही बाबतीत साम्य असते. पण मुळात हे प्रकार भिन्न आहेत. त्यामुळे त्यांत साम्य असते. तसे भेदही असतात.

१) या दोन्ही प्रकारात व्यक्तिच्या जीवनाचा व्यापक पट घेतलेला असतो. यामुळे कथानक दीर्घ असते.

२) दीर्घ कथानकामुळे मानवी जीवनातील संघर्ष, नाटय, काव्य, विनोद, भावना, चित्ताकर्षक घटना, प्रसंग, त्यांची अर्थपूर्णता दोहोतही आलेली असते.

३) जीवनपट मोठा असल्यामुळे व्यक्तिंची किंवा पात्रांची संख्या एकमेंकासारखी, एकमेंकाएवढी येऊ शकते. विविध स्वभावाची माणसे किंवा पात्रे असल्यामुळे व त्यांच्या वर्तनातून जीवनपटाचे ताणे - बाणे विणत चालल्यामुळे दोघातही त्या अंगांनी विविधता आणि मनोरंजकता येते.

४) आत्मचरित्रात निवेदन करणारा 'मी' असतो तर कादंबरीमध्ये निवेदन शैलीचे अनेक प्रकार आहेत.

५) आत्मचरित्रात 'मी' या नायक व्यक्तिच्या समकालीन समाज वास्तवाचे किंवा मानवी जीवन-वास्तवाचे प्रतिबिंब पडलेले असते. तर प्रथम पुरूषी निवेदन पध्दतीमुळे सामाजिक वास्तवावरील कादंबरी आत्मचरित्रासारखी वाटते.

६) आत्मचरित्रात घटित वास्तव असते समाजात आलेले अनुभव त्यावरचे चिंतन-मनन तो आत्मचरित्रात मांडत असतो. कादंबरीतही मानवी जीवनाचे चिंतन-मनन असते. पण ते काल्पनिक 'मी' च्या व काल्पनिक इतर पात्रांच्या जीवनाचे असल्यामुळे ते विचार प्रत्यक्ष जीवनाचा पडताळा वाटण्यास आत्मचरित्राच्या तुलनेने कमी गुणधर्माचे वाटू शकतात.

कादंबरीतील मानवी जीवन कादंबरीकाराने प्रतिभा आणि काल्पनिक पातळीवर निर्माण केलेले असते. म्हणून ते आत्मचरित्रामुळे मार्गदर्शनासाठी विश्वसनीय वाटत नाही. कादंबरीत नाही म्हटले तरी वाचकांचे मनोरंजन करण्याच्या हेतूनेही घटना प्रसंगाची, पात्रांच्या, संवादाची मांडणी असू शकते. त्यामुळेही कादंबरीतील विश्वसनीयता आत्मचरित्रातील विश्वसनीयतेच्या योग्यतेची सहसा वाटू शकत नसते.

आत्मचरित्राच्या तुलनेने कादंबरीचे स्वरूप अधिक व्यापक आणि विविध आहे. तिला परंपरा मोठी आणि दीर्घकालीन आहे. मुळात दोन्ही प्रकारांची प्रकृती भिन्न आहे.

आत्मचरित्र हे मानवी जीवनातील आणि समाजातील एक घटित जीवन असते. त्याला वस्तुस्थितीतील स्थळ, काळ, व्यक्ति, घटना यांचा अपरिहार्य संबंध असतो. तो व्यक्तिचा विशिष्ट काळातील इतिहास असतो. त्याला तारखांचे, सालांचे संदर्भ असतात. कादंबरी ही वस्तू मुळात प्रतिभा आणि काल्पनिक असते. ती वास्तववादी असेल तर एखादा कालाचा आभास निर्माण करू शकते. पण तो काळ निश्चित स्वरूपाचा किंवा विशिष्ट नसतो. पात्रे, घटना, कथानक काल्पनिक असतात. या मुलभूत भेदामुळे आत्मचरित्र व कादंबरी हे भिन्न साहित्य प्रकार ठरतात.

आत्मचरित्राचा हेतू स्वत:चे प्रत्यक्षातील जीवन कथन करणे. आत्मचरित्र लेखकाच्या जीवनात जी माणसे, घटना, प्रसंग, अनुभव प्रत्यक्षात आलेले असतात. यात त्याला काल्पनिक निर्मिती करता येत नाही. आत्मचरित्राची सर्व मांडणी घटित वास्तववादी स्वरूपाचीच असते. उलट कादंबरीचे हेतू अनेक असतात. कादंबरीत काल्पनिक विचाराप्रमाणे वास्तववादी विचारही येतात. कादंबरीनिर्मितीच्या हेतूंना मर्यादा नसते. यामुळे त्या वास्तववादी जशा असतात तशा त्या काल्पनिकही असतात. आत्मचरित्र व्यक्तिनिष्ठ असते. पण कादंबरी व्यक्तिनिष्ठ असू शकते तशी समूहनिष्ठ असू शकते.

आत्मचरित्रात योगायोग असू शकतात. ते वाचताना लेखकाच्या दैवाचे किंवा सुदैवाचे कौतुक वाटते. त्यातून सामान्य वाचकाच्या मनात जीवनावर श्रध्दा निर्माण होऊ शकते. आशावाद निर्माण होऊ शकतो. दुर्दैवी घटनांमुळे 'मी' विषयी सहानुभूती किंवा

हळहळ निर्माण होऊ शकते. आत्मचरित्रात योगायोगाला स्थान असू शकते. यामुळे मानवी जीवनाची चव वाढते. आत्मचरित्र अधिक आवडू शकते.

पण जीवनातील हाच योगायोग कादंबरीत मात्र आणू नये असा संकेत आहे. कादंबरीकाराला पात्र-प्रसंगादी काल्पनिक घटकांच्या आधारे वाचकांपर्यंत नेऊन पोचवायचा असतो. कादंबरीतील पात्रे, प्रसंग इ. घटक काल्पनिक असल्यामुळे त्या पात्रांविषयी सहानुभूती हळहळ वाटण्याची आवश्यकता नसते. किंवा ती सुजाण वाचकाला वाटत नाही.

अनेक लोकप्रिय कादंब-या वास्तववादी नसतात त्या मनोरंजनवादी असतात. कादंबरीचा हेतू मनोरंजन करणे. फावल्या वेळात विरंगुळा वाटण्यासाठी काही चविष्ठ मजकूर पुरविणे हा असतो. त्यात योगायोग असू शकतात. स्वप्नरंजनात रमणा-या वाचकाला त्या कादंब-या भरपूर खाद्य पुरवतात.

कादंबरी व आत्मचरित्रात साम्याप्रमाणे भेदस्थळेही भरपूर आहेत. असे असूनही 'आत्मचरित्रात्मक कादंबरी' असा एक वाड:मयप्रकार कादंबरी वाड.मयात रूढ आहे. कादंबरीकार आपल्या जीवनातील घटना, प्रसंग, अनुभव किंवा आपल्या जीवनपटाचा काही भाग घेऊन कादंबरी लिहू शकतो. अशा कादंब-या बहुधा वास्तववादी असतात. कादंबरीचा नायक 'मी' असला पाहिजे असेही नाही. मात्र 'मी' चे नांव हे लेखकाचे नांव असते.

कादंबरी आत्मचरित्रात्मक आहे असे लेखक कुठे तरी नमूद करतो. एरवी ती आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे. याला अंतर्गत असा पुरावा नसतो. आत्मचरित्रात्मक कादंबरीत लेखक व्यक्तिचे नांव किंवा नांवे बदलू शकतो तशी स्थलनामेही बदलू शकतो. कादंबरीत विषयानुसार व हेतूनुसार आपल्या जीवनातील आवश्यक तेवढेच घटना, प्रसंग, अनुभव व जीवनांश घेऊ शकतो किंवा इतरांचे तेवढेच घटना, प्रसंग, अनुभव हेही मिसळू शकतो. आपल्या अनुभवांचे गैरसोयीचे भाग काढून टाकू शकतो. किंवा त्यात सोयीनुसार विपर्यास करूनही त्यांची मांडणी उलटपालटी, मागेपुढे, कमीजास्त करूनही तो कादंबरी लिहू शकतो. तरीही ती आत्मचरित्रात्मक कादंबरी असू शकते. तिला लेखक म्हणतो म्हणूनच ' आत्मचरित्रात्मक कादंबरी ' म्हणावयाचे वाचकाच्या दृष्टीने काही वेगळे परिमाण लाभत नाही. त्याच्या दृष्टीने ती एक कादंबरीच असते.

लेखकाच्या दृष्टीने मात्र ती अर्थपूर्ण असू शकते. कारण त्याने तिच्यात आत्मविष्कार साधलेला असतो. आपल्या जीवनात जे काही नाटयपूर्ण, खाजगी, उघड उघड न सांगण्याजोगे, गैरसोयीचे घडलेले असते त्याला त्याने आत्मचरित्रात्मक कांदबरीच्या व्दारा वाट मोकळी करून दिलेली असते. त्याने स्वत:च्या घटना, प्रसंग अनुभव, माणसे यांना कादंबरीत आणताना त्यांच्या स्थलकालात, व्यक्तिमानात किंवा त्यांच्या

व्यक्तिमत्वातही जे काही कमी-अधिक बदल केलेले असतात ते कुठे, कसे, का केले हे त्याला माहित असते. अन्य कुणालाही त्या बदलांची माहिती नसते. त्यामुळे लेखकाला ती कादंबरी प्रसिध्दीनंतरच्या वाचनातही एक वेगळा आनंद देत असते. वाचनातील तो खास आनंद इतर वाचकांना मिळत नाही. त्यांना फकत एका कादंबरी वाचनाचाच आनंद मिळू शकतो. म्हणून वाचकाच्या दृष्टिने 'आत्मचरित्रात्मक' या कादंबरी विशेषणाचा काही अर्थ नसतो. फार तर त्याची एक मानवी जिज्ञासा जागी झालेली असते. लेखकाने अमुक एका कादंबरीला 'आत्मचरित्रात्मक' म्हटल्याने वाचकाला त्या जिज्ञासामुळे कादंबरीत डोकावून बघावेसे वाटते. ती वाचल्याने अतिशय ढोबळमानाने लेखकाच्या खाजगी जीवनाविषयी अंदाज करू शकतो. पण तो अंदाज चुकीचा, एकांगी, लेखकाच्या सोयीचा, क्वचित विपर्यस्तही असू शकतो.

' आत्मचरित्रात्मक कादंबरी'चा प्रकार लेखकनिष्ठ (व्यक्तिनिष्ठ) आहे. वस्तुनिष्ठ नाही 'कादंबरी' या वस्तूच्या वाचनातून तो सिध्द करता येत नाही. केवळे लेखकाचे मत म्हणून तिला आत्मचरित्रात्मक कादंबरी मानावे लागते.

' आत्मचरित्रात्मक कादंबरी ' या शब्दप्रयोगाचे दोन अर्थ होतात.

१) आत्मचरित्रातील लेखकाच्या स्वत:च्या जीवनातील घटना, प्रसंग, अनुभव, पात्रे, जीवनपटाचा काही भाग इत्यादि घेऊन किंवा यापैकी काही घेऊन लिहिलेली 'कादंबरी' हाच अर्थ रूढीने सर्वांना मान्य झालेला आहे.

२) दूसरा अर्थ 'आत्मचरित्र' जिचा आत्मा आहे, अशी कादंबरी असा होतो.

आत्मचरित्रात्मक कादंबरी या जोडशब्दाचा एकत्र अर्थ प्रत्यक्ष घडलेल्या घटना प्रसंगावर आधारित काल्पनिक वस्तु असा होत असल्यामुळे आत्मचरित्राचा घटित जीवनाचे घटिताच्या पातळीवरच दर्शन घडविणे हा हेतू कादंबरी या साहित्यप्रकारात साध्य होत नाही आणि कादंबरीलाही 'आत्मचरित्रात्मक' म्हटल्याने वाचकाच्या दृष्टीने तत्वत: काही वेगळे परिमाण लाभत नाही. कादंबरीत आत्मचरित्र आले तर आत्मचरित्राचे मोल कमी होते. कारण कादंबरी मुळात कल्पनाधिष्टित साहित्यप्रकार म्हणूनच स्विकारली जाते.

आपण एखाद्या कादंबरी प्रकारासाठी 'आत्मचरित्रात्मक कादंबरी' असा शब्दप्रयोग करू शकतो. पण एखाद्या आत्मचरित्रासाठी किंवा आत्मचरित्राच्या एखाद्या प्रकारासाठी 'आत्मचरित्रात्मक कादंबरी' असा शब्दप्रयोग करणे तत्वत: चुकीचे आहे.

सारांशाने आत्मचरित्र व कादंबरी हे आपापल्या परीने महत्वाचे सशक्त प्रकार आहेत.

## संदर्भ सूची


| अ.नं. | पुस्तकाचे नांव | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | चरित्र - आत्मचरित्र तंत्र आणि इतिहास | अ. म. जोशी (व्दितीयावृत्ती) | |
| २ | चरित्र आणि आत्मचरित्र (साहित्यरूप) | सदा क-हाडे (प्रथमावृत्ती) | |
| ३ | आत्मचरित्र मीमांसा | आनंद यादव (प्रथमावृत्ती) | |